# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः29.05.2024 वारःबुधवार

---

१. लोकसभा निवडणूकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यात प्रचार शिगेला; मातब्बर नेत्यांकडून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी
२. सहाव्या टप्प्यासाठी 63 पुर्णांक 37 टक्के मतदान; महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा तीन टक्क्यांनी अधिक
३. १९९९मध्ये पाकिस्ताननं भारताबरोबरच्या करारचं उल्लंघन केल्याची नवाझ शरीफ यांची कबूली
४. भारतीय सैन्यदलातील मेजर राधिका सेन यांना संयुक्त राष्ट्राचा पुरस्कार जाहीर
आणि
५. ताश्कंद इथं झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाला आर्म रेसलिंगमध्ये एकंदर सात पदकं.

**<u>सातवा-टप्पा</u>**
लोकसभा निवडणूकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यातील प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. प्रचारासाठी केवळ दोन दिवसांचा कालावधी असताना सर्वपक्षीय नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. या टप्प्यात सात राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ५७ जागांवर येत्या १ जून रोजी मतदान होत आहे. अखेरच्या टप्प्यात एकंदर ९०४ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल पश्चिम बंगालमधील चौबीस परगना जिल्ह्यातील बरासात आणि बशिरहाट लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतल्या. झारखंडमधील दुमका विमानतळ मैदानावरील जाहीर सभेलाही त्यांनी काल संबोधित केलं. भ्रष्टाचार करणाऱ्यांविरोधातील कारवाई 4 जूननंतर आणखी तीव्र केली जाईल, असं मोदी यांनी विरोधकांवर टीका करताना सांगितलं.

बिहारमध्ये जनता दल संयुक्तचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी नालंदा मतदारसंघातील सभेला संबोधित केलं. भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नित्यानंद राय यांनी करकट मतदारसंघांतील बरुण इथं जाहीर सभा घेतली.

राजद प्रमुख लालूप्रसाद यादव यांनी पाटणा इथं प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळची लोकसभा निवडणूक आरक्षण आणि भारतीय संविधान वाचवण्यासाठी आहे असं त्यांनी सांगितलं. या निवडणुकीत भाजपचा ४०० हून अधिक जागांचा दावा फोल ठरेल, अशी टीकाही त्यांनी केली. हिमाचल प्रदेशातील उना जिल्ह्यातील गाग्रेट इथं एका प्रचारसभेत काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी भाजप सरकार महागाई आणि बेरोजगारी कमी करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे.

झारखंडमध्ये संथाल भागातील गोड्डा, दुमका आणि साहिबगंज या तीन मतदारसंघात प्रचाराला वेग आला आहे. भाजपा, झारखंड मुक्ती मोर्चा, काँग्रेस, राजद, ऑल झारखण्ड स्टूडेंट्स यूनियन आणि इतर पक्षांसह विविध नेते आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रचारसभा आणि रोड शो करत आहेत. भाजप अध्यक्ष जेपी नड्डा आज दुमका आणि गोड्डा इथं तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी उद्या दुमका इथं प्रचारसभेला संबोधित करतील.

**<u>महिला मतदान</u>**
लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा ३ टक्क्यांनी जास्त असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. सहाव्या टप्प्यात 61 पूर्णांक 95 टक्के पुरुष मतदार आणि 64 पूर्णांक 95 टक्के महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या टप्प्यात बिहार, झारखंड, लडाख, ओडिशा आणि उत्तर प्रदेशमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांचा सहभाग लक्षणीय होता.याशिवाय, 18 पूर्णांक 67 टक्के तृतीय पंथिय मतदारांची नोंद झाली आहे. मतदान प्रक्रियेत सगळ्यांच्या सहभागाचं हे प्रतीक आहे.पश्चिम बंगालमध्ये मतदारांच्या निवडणूक उत्साहात ,सर्वाधिक 81 पूर्णांक 62 टक्के मतदानाची नोंद झाली तर बिहारमध्ये 51 पूर्णांक 95 टक्के मतदान झालं. सहाव्या टप्प्यात 25 मे रोजी आठ राज्यांमधल्या 58 जागांसाठी मतदान झालं .

हरियाणा
हरियाणातील सोनिपत जिल्ह्यातील राय औद्योगिक क्षेत्रात काल संध्याकाळी एका रबर कारखान्याला लागलेल्या आगीत किमान ४० ते ४५ जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. यातील ५ जणांची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमींना नजिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही आग नक्की कशामुळे लागली याचं कारण अद्याप स्पष्ट नसलं तरी कारखान्यात बॉयलरचा स्फोट झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

**नवाझ-शरिफ**

१९९९मध्ये पाकिस्ताननं भारताबरोबरच्या करारचं उल्लंघन केलं होतं अशी कबूली पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरिफ यांनी काल पाकिस्तान मुस्लिम लीगच्या सर्वसाधारण बैठकीत दिली. २८ मे १९९८ रोजी आपण अण्वस्त्र चाचणी घेतली होती, २१ फेब्रुवारी १९९९ रोजी तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी लाहोरला भेट दिली होती आणि लाहोर घोषणापत्रावर स्वाक्षरी केली होती.

भारत आणि पाकिस्तान दरम्यान शांतता आणि स्थिरता वाढवणं हा या कराराचा उद्देश होता. हा करार केलेला असतानाही पाकिस्तानी सैन्यानं जम्मू-काश्मीरमधील कारगिल जिल्ह्यात घुसखोरी केली, आणि त्यामुळेच कारगिल युद्ध झालं, असा खुलासाही शरीफ यांनी केला. या बैठकीनंतर शरीफ यांची PML-N पक्षाचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. पनामा पेपर्स प्रकरणी गेल्या ६ वर्षांपासून न्यायालयान त्यांना अपात्र घोषित केलं होतं.

**UN 2023**

भारतीय सैन्यदलातील शांतीदूत मेजर राधिका सेन यांची संयुक्त राष्ट्राच्या 2023 साठी दिल्या जाणाऱ्या मिलिटरी जेंडर ॲडव्होकेट ऑफ द इयर पुरस्कारासाठी निवड झाली आहे. शांतीदूत म्हणून काम करताना महिला आणि मुलींसाठी दिलेल्या न्यायालयीन लढ्याची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. त्या आदर्श नेत्या असल्याचं संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी सांगितलं. राधिका यांनी काँगोमधील उत्तर किवमध्ये तरुण आणि महिलांच्या सुरक्षेसाठी लढा दिला. हिमाचल प्रदेशच्या असलेल्या सेन या बायोटेक विषयातील अभियंता आहेत. पदव्युत्तर पदवीचं शिक्षण घेत असताना त्या कमांडर म्हणून नियुक्त झाल्या. दक्षिण सुदानमध्ये संयुक्त राष्ट्राबरोबर काम करणाऱ्या मेजर सुमन गवानी यांच्यानंतर हा सन्मान मिळवणार्या सेन या दुसऱ्या भारतीय शांतता दूत आहेत.

**मुंबई-कोस्टलरोड**

मुंबईतील वरळी आणि मरीन ड्राइव्ह दरम्यानचा कोस्टल रोड येत्या १० जूनपासून वाहतूकीसाठी खुला होणार असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पत्रकारांना सांगितलं. तसंच पहिल्या टप्प्याचा भाग असलेल्या मरिन ड्राइव्हच्या दक्षिणेकडील बोगद्यातील गळतीचीही त्यांनी पाहणी केली. गळती होत असलेल्या भागाची तात्काळ दुरुस्ती केली जाईल. या भागातून प्रवास करणाऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही हे सुनिश्चित केलं जाईल अशी ग्वाही शिंदे यांनी यावेळी बोलताना दिली.

**NIA**

देशाच्या ईशान्य सीमेवरुन बांग्लादेशी नागरिक आणि रोहिंग्यांची मानवतस्करी करणाऱ्या मुख्य सुत्रधारांपैकी एक असलेल्या आरोपीला राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयए नं काल अटक केली. त्रिपुराचा रहिवासी असलेला जलील मिलाह याला NIA नं ताब्यात घेतलं आहे. तस्करी करणाऱ्या टोळीचा प्रमुख जीबान रुद्र पाल बरोबर तो काम करत असल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे. या प्रकरणात यापुर्वी ३३ जणांना अटक करण्यात आली आहे. एनआयएच्या तपासानूसार, भारत-बांगलादेश सीमेवरील काही भागातून दर महिन्याला मोठ्या संख्येने बांगलादेशी नागरिक आणि रोहिंग्यांची भारतात तस्करी होत असल्याचं समोर येत आहे.

**नवेपंतप्रधान**

डच गुप्तचर सेवेचे माजी प्रमुख, डिक स्कूफ नेदरलँड्सचे नवे पंतप्रधान असतील. ते गीर्ट वाइल्डर्सच्या फ्रीडम पार्टीच्या नेतृत्वाखालील युतीचं नेतृत्व करतील. डिक स्कूफ हे न्याय मंत्रालयातील सर्वोच्च अधिकारी आहेत. मंत्रिमंडळाची स्थापना आणि शपथविधीला आणखी काही अवधी लागण्याची शक्यता आहे.

**आर्मरेसलिंग**

उझबेकिस्तानमधल्या ताश्कंद इथं झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघानं आर्म रेसलिंगमध्ये, एक सुवर्ण आणि सहा कास्य पदकांसह एकंदर सात पदकं पटकवली आहेत. दोन प्रकारांमध्ये सहभागी झालेल्या श्रीमंत झा ची कामगिरी या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरली. त्याने डाव्या हाताच्या पॅरा श्रेणीत सुवर्णपदक तर उजव्या हाताच्या पॅरा श्रेणीत कांस्यपदक पटकावलं.

मास्टर्स प्रकारात लक्ष्मणसिंग भंडारीनं दोन कांस्यपदकं जिंकली, तर सचिन गोयलनं उजव्या हाताच्या वरिष्ठ गटात कास्यपदक पटकावलं. दरम्यान, महिलांच्या उजव्या आणि डाव्या हाताच्या गटात अरुणाचल प्रदेशच्या इबी लोलेननं दोन कास्यपदकं जिंकली.

**गिर्यारोहक**

भारतीय गिर्यारोहक सत्यदीप गुप्ता यांनी एकाच मोसमात दोनदा माउंट एव्हरेस्ट आणि माऊंट ल्होत्से या शिखरांवर चढाई करत ती शिखरं सर करणारे पहिले गिर्यारोहक म्हणून नवा ऐतिहासिक विक्रम केला आहे. माउंट एव्हरेस्ट ते माऊंट ल्होत्से हे अंतर 11 तास 15 मिनिटांत चढणारे पहिले भारतीय म्हणून त्यांनी आणखी एक विक्रम केला आहे.

आयोजकांच्या म्हणण्यानुसार, गुप्ता यांनी सोमवारी 27 तारखेला दुपारी त्यांनी 8 हजार 516 मीटर उंच माउंट ल्होत्से वर चढाई पूर्ण केली त्यानंतर मध्यरात्री 12वाजून 45 मिनिटांनी वाज 8 हजार 849 मीटर उंच माउंट एव्हरेस्टवर विजयी आरोहण केलं . गुप्ता यांनी यापूर्वी २१ मे रोजी एव्हरेस्ट आणि २२ मे रोजी ल्होत्से शिखर सर केले होते. ही कामगिरी म्हणजे जगातील सर्वात उंच आणि एकाच मोसमातली चौथ्या क्रमांकाची पहिली चढाई आहे. त्यांच्यासमवेत गिर्यारोहण मार्गदर्शक पस्तेंबा शेर्पा आणि निमा उंगडी शेर्पा होते.

दरम्यान ,नाशिकच्या पोलीस निरीक्षक द्वारका डोखे यांनी एव्हरेस्ट शिखर सर केलं आहे; एव्हरेस्ट मोहीम यशस्वी करणाऱ्या राज्य पोलीस दलातील त्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत.त्यांच्या या कामगिरीबद्दल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. त्यांचं हे अभूतपूर्व यश पोलिसांना आणि विशेषतः महिला पोलिसांना नक्कीच प्रोत्साहन देईल, असं फडणवीस यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**मिझोराम आसाम मृत्यू**

रेमल चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे ईशान्य भारतात सामान्य जनजीवन ठप्प झालं आहे. मिझोराममध्ये किमान 23, आसाममध्ये 3 आणि मेघालयमध्ये एका जणांचा मृत्यू झाला. सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे झाडे, विजेचे खांब उन्मळून पडले. त्यामुळे मोबाइल आणि इंटरनेट सुविधा विस्कळीत झाली आहे. मिझोराममध्ये, राजधानी आयझॉलच्या बाहेरील क्षेत्रात दगडाच्या खाणी कोसळलयानं आणि संततधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनात किमान 23 लोक ठार झाले असून नऊ जण बेपत्ता असल्याचं वृत्त आहे.

मिझोरामचे मुख्यमंत्री लालदुहोमा यांनी मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. राज्य सरकारचं परिस्थितीवर बारकाईने लक्ष असून नुकसानीची माहितीही घेतली जात आहे. दरम्यान, संततधार पावसामुळे काल राज्यातील सर्व शाळा आणि सरकारी कार्यालये बंद होती. आसाममध्येही तीन जणांचा मृत्यू झाला असून १७ जण जखमी झाले आहेत. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी या दुर्घटनांमध्ये झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**IMD-हवामान**

मध्य आणि वायव्य भारतात असलेली उष्णतेची तीव्र लाट उद्यापासून हळू हळू कमी होण्याची शक्यता आहे, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) वर्तवला आहे. दिल्लीतील मुंगेशपूर भागात काल या हंगामातल्या सर्वाधिक ४९ पूर्णांक ९ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.केरळमध्ये नैऋत्य मोसमी पाऊस सुरू होण्यासाठी आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही भागांमध्ये पुढील २-३ दिवसांत तो पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार